"गणेश चतुर्थी निमित्त पाच पारंपारिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना उत्सव भत्ता योजना."

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः हातमाग-२०२३/प्र.क्र.९२/टेक्स-३**
नविन प्रशासन भवन, १४ वा मजला
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०९ नोव्हेंबर, २०२३.

**वाचा :**

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दिनांक ०२.०६.२०२३. (परिच्छेद क्रमांक ७.८)

**प्रस्तावना :**

राज्याच्या वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी व वस्त्रोद्योगाला आवश्यक त्या उपाययोजनांना हातभार लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर केलेले आहे. यानुसार एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण आणि त्यातील सर्व संबंधित योजना हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या तारखेपासून कार्यान्वित होईल आणि दि. ३१.०३.२०२८ पर्यंत वैध राहील असे नमूद आहे. सदर धोरणातील परिच्छेद क्रमांक ७.८ मध्ये पारंपारिक वस्त्रोद्योग, अतिरिक्त प्रोत्साहने - गणेश चतूर्थी निमित्त पाच पारंपारिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना उत्सव भत्ता देण्यात येईल असे नमूद आहे.

महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग क्षेत्राला प्राचीन काळापासून प्रदीर्घ इतिहास आहे. ही वस्त्रे कापूस, रेशीम आणि लोकर यासह विविध प्रकारच्या सामग्री पासून तयार केली जातात. उपजिवीकेचे संरक्षण सुनिश्चित करून पारंपारीक वस्त्रोद्योग विणकरांना इतर रोजगारांकडे स्थलांतरीत होण्यापासून परावृत्त करण्याच्या दृष्टीने अतिरीक्त प्रोत्साहन देणे या धोरणाचे उदिष्ट आहे. महाराष्ट्रातील खालील पाच वस्त्रोद्योगांना पारंपारीक वस्त्रोद्योग म्हणून मानले जाईल.

१) पैठणी साडी- छत्रपती संभाजीनगर
२) हिमरू - छत्रपती संभाजीनगर
३) करवत काठी - विदर्भ
४) घोंगडी - पश्चिम महाराष्ट्र
५) खण फॅब्रीक - दक्षिण महाराष्ट्र

राज्यातील पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना प्रोत्साहन देण्याकरता गणेश चतुर्थी निमित्त वरील पाच पारंपारिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना उत्सव भत्ता योजना तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

राज्यातील (१) पैठणी साडी- छत्रपती संभाजीनगर, (२) हिमरू शाल- छत्रपती संभाजीनगर, (३) करवत काठी साडी- विदर्भ, (४) घोंगडी- पश्चिम महाराष्ट्र व (५) खण फॅब्रीक - दक्षिण महाराष्ट्र या पाच पारंपारिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना प्रति पुरुष रु.१०,०००/-व प्रति महिला रु.१५,०००/- उत्सव भत्ता देय करण्याच्या योजनेस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. ***योजनेचे पहिले वर्ष असल्याने सन २०२३-२४ मध्ये गणेश चतुर्थी ऐवजी मकरसंक्रांती निमित्त सदरचा उत्सव भत्ता मंजूर करण्यात येईल.*** तदनंतर सन २०२४-२५ पासून सदर उत्सव भत्ता गणेश चतुर्थीनिमित्त मंजूर करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

२. **सदर योजनेअंतर्गत पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना उत्सव भत्ता देय करण्यासाठी पात्रतेकरीता निकष :-**

**अ)** महाराष्ट्रातील (१)पैठणी साडी- छत्रपती संभाजीनगर, (२) हिमरू शाल- छत्रपती संभाजीनगर, (३) करवत काठी साडी- विदर्भ, (४) घोंगडी- पश्चिम महाराष्ट्र व (५) खण फॅब्रीक - दक्षिण महाराष्ट्र या पाच पारंपारिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील जिल्हा/प्रादेशिक विभागांतर्गत प्रमाणित व नोंदणीकृत हातमाग विणकर.

**ब)** महाराष्ट्राचे रहिवासी असणे आवश्यक.

**क)**केंद्र शासनाने अलीकडील काळात केलेल्या हातमाग जगणनेच्या (Latest Handloom Census) यादी मध्ये नाव आवश्यक.

**ड)** पारंपारिक वस्त्रोद्योग विणकर असल्याचा पुरावा आवश्यक.

**इ)** लाभार्थ्यांच्या नावे बँक खाते असणे आवश्यक.

३. **योजनेची कार्यपध्दती :-**

(१) केंद्र शासनाने अलीकडील काळात केलेल्या हातमाग जनगणनेच्या (Latest Handloom Census) यादीमध्ये समावेश असणाऱ्या हातमाग धारकापैकी उपरोक्त ५ प्रकारच्या पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांनी उत्सव भत्ता या अर्थसहाय्याचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह संबंधीत प्रादेशिक उप आयुक्त (वस्त्रोद्योग) यांच्याकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा ***(Online पद्धती विकसित झाल्यापर्यन्त प्रस्ताव Offline पद्धतीने स्वीकारण्यात येईल).***

(२) केंद्र शासनाने अलीकडील काळात केलेल्या हातमाग जनगणनेच्या (Latest Handloom Census) यादीमधील अर्जदाराकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधीत प्रादेशिक उप आयुक्त (वस्त्रोद्योग) अर्जदार विणकराकडून पुरावा घेऊन सदर विणकर हे उपरोक्त पारंपारिक क्षेत्रामधील विणकर असल्याची खातरजमा करतील व प्राप्त प्रस्तावाची छाननी व तपासणी करुन आपल्या शिफारशींसह पारंपारीक हातमाग विणकरांची यादी आयुक्त (वस्त्रोद्योग) वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांना मंजूरीसाठी सादर करतील.

(३) वस्त्रोद्योग आयुक्तालयाने सदर यादीची छाननी व तपासणी केल्यानंतर सदर योजनेअंतर्गत प्रमाणित व नोंदणीकृत पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना देण्यात येणारे प्रती पुरुष विणकर रू.१०,००० आणि प्रती महिला विणकरांना रू.१५,००० उत्सव भत्ता DBT प्रणालीद्वारे पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात यावा. याकरिता आयुक्त वस्त्रोद्योग यांनी उचित कार्यवाही करावी.

४. सदर योजना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर झालेल्या दिनांकापासून ३१ मार्च, २०२८ पर्यंत कार्यरत राहील.

५. या योजनेंतर्गत खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विहीत मुदतीत शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. सदर योजनेतंर्गत अनुदान देताना वित्तीय नियम व संबंधित कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

६. सदरहू कामांकरीता आयुक्त(वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर हे "नियंत्रक अधिकारी" म्हणून काम पाहतील. तसेच कामांकरीता उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे आयुक्त(वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी खात्री करावी.

७. याद्वारे मंजूर निधी खर्च करतांना तो विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. सदर निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकाराच्या मर्यादेचा तसेच कोणत्याही शासन निर्णयाचा भंग होणार नाही हे आयुक्त(वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी पहावे.



Scanned with OKEN Scanner

८. सदर निधी वेळोवेळी वितरीत करण्यासाठी उप सचिव (अर्थसंकल्प), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तात्काळ उचित कार्यवाही करावी. आयुक्त(वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून तसेच लेखाधिकारी, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी कामाबाबतचा अहवाल वेळोवळी शासनास सादर करावा व याबाबत महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ घेवून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

९. सदर योजनेकरीता " **मागणी क्रमांक व्ही-२ , लेखाशिर्ष- २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (०३) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८, (०३) (०३) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत गणेश चतूर्थी निमित्त पाच पारंपारिक वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रमाणीत व नोंदणीकृत विणकरांना उत्सव भत्ता योजना (कार्यक्रम) (२८५१ ७४१८) ३३,अर्थसहाय्य"** या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित करण्यात येणा-या तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३११०९१४२५३५७५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRADDHA DEVEN KOCHAREKAR

Digitally signed by SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=[illegible], postalCode=[illegible], st=Maharashtra, serialNumber=[illegible], cn=SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
Date: 2023.11.09 14:24:49 +05'30'

**( श्रध्दा कोचरेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. मंत्रालय, मुंबई ३२,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२
५. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. महालेखापाल ( लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
११. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
१२. नियोजन विभाग (कार्यासन -१४३१), मंत्रालय, मुंबई.
१३. प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग), मुंबई/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/सोलापूर.
१४. निवड नस्ती ( टेक्स-३).



Scanned with OKEN Scanner